**Deputy Superintendent of Police, ACB, Nandurbar**
पोलीस उपअधीक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार
पत्ता – १२, जयचंद नगर, कोरीट रोड, नंदुरबार, ता.जि. नंदुरबार–४२५४१२
कार्यालय संपर्क कमांक – ☎ (०२५६४) २३०००९
इमेल आयडी – ✉dyspacbnandurbar@gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

ला.प्र.वि.कार्यालय,नंदुरबार
दिनांक २३/०३/२०२२.

## :–प्रेस नोट :–

आलोसे नं. १) श्री. सुनिल दिगंबर पिंगळे, वय–४९, व्यवसाय– नोकरी, बांधकाम उपअभियंता, (वर्ग–१), जि.प.बांधकाम उपविभाग कार्यालय, अक्कलकुवा ता.अक्कलकुवा जि.नंदुरबार रा. प्लॉट नं. ३, सुखशांती अपार्टमेन्ट २ माळा,नंदुरबार जि.नंदुरबार आलोसे नं २) श्री. संजय बाबुराव हिरे, वय–५२, व्यवसाय– नोकरी, सहाय्यक अभियंता, (वर्ग–२), जि.प.बांधकाम उपविभाग कार्यालय, अक्कलकुवा ता.अक्कलकुवा जि.नंदुरबार रा. प्लॉट नं ४,गुरुकुल हौसींग सोसायटी,शहादा जि.नंदुरबार. खाजगी इसम नं.३) श्री अभिषेक सुभाष शर्मा वय–३२, व्यवसाय– शिक्षण, (खाजगी इसम), रा.अहिल्याबाई विहीरीजवळ नंदुरबार जि.नंदुरबार यांना ४३,७५,०००/–रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती ४,००,०००/– रुपये लाचेची रक्कम स्विकारतांना पंचांसमक्ष रंगेहात पकडले बाबत..

| | |
|---|---|
| घटक | नंदुरबार |
| गुन्हा नोंद कमांक | नंदुरबार शहर पोलीस स्टेशन गु.र.नं १८६/२०२२ |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७,१२ प्रमाणे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | **आलोसे नं. १)** श्री. सुनिल दिगंबर पिंगळे, वय–४९, व्यवसाय– नोकरी, उपविभागीय अभियंता, (श्रेणी–२), जि.प.बांधकाम उपविभाग, अक्कलकुवा जि.नंदुरबार **आलोसे नं २)** श्री. संजय बाबुराव हिरे, वय–५२, व्यवसाय– नोकरी, सहा. अभियंता, (श्रेणी–२), जि.प. बांधकाम उपविभाग, अक्कलकुवा जि.नंदुरबार **खाजगी इसम नं.३)** श्री अभिषेक सुभाष शर्मा वय–३२, व्यवसाय– शिक्षण, (खाजगी इसम) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | **४३,७५,०००/– रुपये (४३ लाख ७५ हजार)** |
| तडजोडीअंती स्विकारलेली लाचेची रक्कम | **४,००,०००/– रुपये (चार लाख रुपये)** |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार हे शससकीय मान्यताप्राप्त व नोंदणीकृत बांधकाम ठेकेदार आहेत. तक्रारदार यांना जिल्हा परिषद, नंदुरबार अंतर्गत अक्कलकुवा उपविभाग मार्फत भगदरी येथील भगदरी गुरांचा दवाखान्याची नवीन ईमारत बांधणे, रस्ता सुधारणा, रस्ता जलनिस्तारणाची कामे व ईतर ४५ कामांचे कार्यरंभ आदेश मिळाले होते व नमुद सर्व कामे तक्रारदार यांनी पुर्ण केली आहेत. सदर कामांबाबत आलोसे यांनी तक्रारदार यांचे एकुण आठ कोटी पंचेचाळीस लाख एकोन्नवद हजार रुपये (८,४५,८९,०००/– रुपये) अंतिम देयके मान्य केली असुन यापैकी एकुण सात कोटी एकसष्ट लाख एकोन्नवद हजार रुपये (७,६१,८९,०००/– रुपये) एवढी रक्कम तक्रारदार यांना प्राप्त झाली आहे. तसेच एकुण मान्य रकमेपैकी उर्वरीत ८४ लाख (८४,००,०००/– रुपये) एवढी रक्कम आलोसे यांनी राखुन ठेवुन तक्रारदार यांना मुद्दामहुन अनामत रक्कम राखुन ठेवली असे सांगितले. सदरची ८४,००,०००/– रुपये उर्वरीत रक्कम मिळणेकामी तक्रारदार यांनी वेळोवेळी जि.प. बांधकाम उपविभाग कार्यालय,अक्कलकुवा येथे उप अभियंता सुनील पिंगळे व सहाय्यक अभियंता एस बी.अहिरे यांना भेटुन उर्वरीत देयकाची रक्कम मिळणेकामी विचारणा केली असता त्यांनी तक्रारदार यांना वेळोवेळी या आधी दिलेल्या देयकांबाबतच्या रक्कमेच्या |

Scanned with CamScanner

| | |
|---|---|
| | मोबदल्यात तक्रारदार यांचेकडुन उपअभियंता सुनिल पिंगळे साहेब यांनी तीस लाख पन्नास हजार रुपये (३०,५०,०००/– रुपये) व शाखा अभियंता एस.बी. हिरे साहेब यांनी तेरा लाख पंचवीस हजार रुपयांची (१३,२५,०००/– रुपये) अशी एकुण त्रेचाळीस लाख पंच्याहत्तर हजार रुपये (४३,७५,०००/– रुपये) एवढया रकमेची मागणी केली. तसेच मागणी केलेली रक्कम/पैसे दिले नाही तर तुमचे उर्वरीत देयके तुम्हाला भेटु देणार नाही असे सांगितले. तसेच तक्रारदार यांनी आलोसे यांना वरील नमुद रक्कम दयावी याची हमी म्हणुन तक्रारदार यांचेकडुन आलोसे यांनी जळगाव जनता सहकारी बॅक, शाखा नंदुरबार या बॅकेचा ३० लाख ५० हजार रुपयांचा चेक/धनादेश व १३ लाख २५ हजार रुपयांचा चेक/धनादेश असे दोन चेक/धनादेश दिनेश यादवराव सोनवणे या आलोसे यांच्या ओळखीच्या इसमाचे नावाने लाचे पोटी लिहुन घेवुन त्यांचे ताब्यात ठेवले व रोख रक्कम आणुन दिल्यानंतर सदरचे चेक/धनादेश परत करुन देवु असे सांगीतले होते. १) सुनिल दिगंबर पिंगळे जि.प. बांधकाम उपअभियंता (वर्ग–१), एस बी.हिरे, जि.प.बांधकाम सहाय्यक अभियंता (वर्ग–२) दोन्ही नेमणुक जि.प.बांधकाम उपविभाग कार्यालय, अक्कलकुवा ता. अक्कलकुवा जि.नंदुरबार यांनी तक्रारदार यांच्याकडुन ४३,७५,०००/– रुपये (४३ लाख ७५ हजार रुपये) लाचेची मागणी करुन तडजोडीअंती प्रथम हप्ता/टोकन रक्कम ४,००,०००/– रुपये आज दि.२३/०३/२०२२ रोजी पंचसाक्षीदारांसमक्ष लाचेची रक्कम स्विकारली आहे. आलोसे यांना ताब्यात घेण्यात आले असुन गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| **कामगिरी पथक** | सदर कामगिरी पोलीस उपअधीक्षक, श्री.राकेश आनंदराव चौधरी, पोलीस निरीक्षक, श्री. समाधान महादु वाघ, पोलीस निरीक्षक, श्रीमती. माधवी एस.वाघ,पोहवा/उत्तम महाजन, पोहवा/विलास पाटील, पोहवा/विजय ठाकरे, पोना/अमोल मराठे, पोना/देवराम गावीत, मपोना/ज्योती पाटील, पोना/नावाडेकर, पोना/मनोज अहिरे,चापोना/ जितेंद्र महाले ॲन्टी करप्शन ब्युरो, नंदुरबार पथकाने केली आहे. |

लाचलुचपत विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोवसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नंदुरबार कार्यालयास संपर्क करावा.


संपर्क पत्ता : ला.प्र.वि.नंदुरबार कार्यालय
संकेतस्थळ : acbnandurbar@gmail.com
ई–मेल : dyspacbnandurbar@mahapolice.gov.in
ऑनलाईन तक्रार/ॲप्लीकेशन : acbnandurbar@gmail.com
टोल फ्री क्रमांक : १०६४
दुरध्वनी क्रमांक : ०२५६४– २३०००९,२३१००९


( राकेश आ.चौधरी )
पोलीस उपअधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,नंदुरबार

Scanned with CamScanner